## ॥ भगवान श्रीसदगुरु ज्ञानेश्वर महाराज ॥

सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणजे श्रीभगवंतांचेच प्रत्यक्ष अवतार ! ‘ **कळिकळित भूतां** ’ साठी ज्ञान-योग विभव भांडार खुले करून त्यांना ‘ **स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती पद** ’ बहाल करणारे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणजे सकल विश्वाची माउली !

श्रीभावार्थदीपिका अर्थात् श्रीज्ञानेश्वरी , श्रीचांगदेवपासष्टी , श्रीहरिपाठ व अभंगगाथा हे श्रीमाउलींचे ब्रह्मरसाने ओतप्रोत भरलेले वाङ्मय म्हणजे जणू परममंगल अशा श्रीभगवंतांच्या स्वानंदस्वरूपाचेच प्रकटीकरण होय .

ठरावीक लोकसमूहाची मक्तेदारी बनून राहिलेल्या , संस्कृतमध्ये बंदिस्त झालेल्या ज्ञानाला ‘ **देशीकार लेणे** ’ चढवून, श्रीमाउलींनी जनसामान्यांसाठी भक्ती-मुक्तीचा मार्ग खुला केला . संपूर्ण जगभर आश्चर्याचा विषय बनून राहिलेल्या वारकरी ( भागवत ) संप्रदायाला , श्रीमाउलींनी अद्वैत- भक्ती व वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रशस्त व सुदृढ पाया घालून दिला .

ठरविलेले कार्य पूर्ण झाल्यावर , वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी श्रीक्षेत्र आळंदी येथे श्रीमाउलींनी संजीवन समाधी घेतली . या घटनेला आज सातशेहून अधिक वर्षे झालेली असली तरी , नित्य ‘ **अनवरत आनंद** ’ वर्षविणाऱ्या श्रीमाउलींच्या करुणाकृपेची निरंतर अनुभूती भक्तांना अखंड येत असते .

प.पू.सद्गुरु श्री.मामा हे श्रीमाउलींचे अनन्य भक्त . श्रीज्ञानेश्वरीचे अंतरंगअधिकारी , गाढे चिंतक-अभ्यासक होते. श्रीज्ञानेश्वरी हा आपल्या संप्रदायाचा प्रमुख अभ्यासग्रंथ . प्रत्यक्ष श्रीमाउलींनी दर्शन-अनुग्रह देऊन प.पू.श्री.मामांना पूर्ण कृपा केली होती .

आजमितीस , श्रीमाउलींच्या तत्त्वज्ञानाच्या प्रचार-प्रसाराचे कार्य प.पू.श्री.मामांच्या अनुग्रह परंपरेत प.पू.सौ.शकाताई व प.पू.श्री.शिरीषदादा अत्यंत तळमळीने , सेवाभावाने अखंड करीत आहेत .